# ठळक शुद्धलेखन




डॉ. पवन मांडवकर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुशिक्षित | सुशीला | सुज्ञ | सूचक | सूचना |
| सूचित | सूज | सूतिकागृह | सूत्रधार | सून |
| सूर्यग्रहण | सूर्यास्त | सूक्ष्म | सैनिक | सोज्ज्वळ |
| सोयरीक | सोशीक | स्तूप | स्तोत्र | स्त्री |
| स्थानिक | स्थानीय | स्थायिक | स्थिर | स्थूल |
| स्नेहांकित | स्पष्टीकरण | स्फुट | स्फूर्ती | स्मित |
| स्मृतिचित्र | स्रोत | स्वरूप | स्वर्गीय | स्वाभाविक |

**ह**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हकीम | हनुमान | हरिजन | हरी | हरित |
| हळुवार | हळूहळू | हारजीत | हार्दिक | हाहाकार |
| हित | हिरिरी | हिंदुस्थान | हिंस्र | हुकुमशाही |
| हुकूम | हुतुतू | हुबेहूब | हृदय | हृषीकेश |

**क्ष**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षणिक | क्षत्रिय | क्षितिज | क्षीण | क्षुद्र |

**ज्ञ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ज्ञाती | ज्ञानकोश | ज्ञानपीठ | ज्ञानी | ज्ञानेंद्रिय |


डॉ. पवन मांडवकर यांची अन्य अभ्यसनीय पुस्तके

- ✦ झटपट शुद्धलेखन ✦ झटपट पत्रलेखन ✦
- ✦ झटपट निबंध ✦ झटपट मराठी शुद्धलेखन ✦
- ✦ अर्वाचीन मराठी कविता १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप ✦
- ✦ दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा ✦
- ✦ बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा ✦
- ✦ दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य (संपादित) ✦
- ✦ संत साहित्य (संपादित)




# ठळक शुद्धलेखन

**(शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि मराठीच्या अभ्यासकांना विशेष उपयुक्त)**

## डॉ. पवन मांडवकर


**डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र**

इंदिरा महाविद्यालय, कळंब,

जि. यवतमाळ ४४५ ४०१

दूरध्वनी : ०७२०१–२२६१४७, २२६१२९, २२६१७०

०७२३२–२५२९७५

भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८ / ९४०३०१४८८५

मूल्य चाळीस रुपये

ISBN 978-81-925695-4-3

◈ **ठळक शुद्धलेखन**

[Thalak Shuddhalekhan]

◈ © **प्राचार्य डॉ. पवन मांडवकर**

© Principal Dr. Pavan Mandavkar

◈ प्रथमावृत्ती २५ ऑक्टो., २००३ (लक्ष्मीपूजन)(सेवा प्रकाशन)

द्वितीयावृत्ती २२ ऑक्टो., २००४ (विजयादशमी)(सेवा प्रकाशन)

तृतीयावृत्ती २३ ऑक्टो., २०१४ (लक्ष्मीपूजन)

◈ **संगणक / मुखपृष्ठ**

डॉ. पवन मांडवकर, डॉ.सौ. वीरा मांडवकर

◈ **प्रती** १००० ◈ **आकार** क्राऊन

◈ **पृष्ठसंख्या** ३२ ◈ **मुखपृष्ठ** फोर कलर

◈ **प्रकाशन क्र.** ७

◈ **प्रकाशक / मुद्रक / वितरक**

डॉ.सौ. वीरा मांडवकर,

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र

इंदिरा महाविद्यालय, कळंब,

जि. यवतमाळ ४४५ ४०१

दूरध्वनी : ०७२०१–२२६१४७, २२६१२९, २२६१७०

०७२३२–२५२९७५

भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५

◈ **वितरण**

सेवा प्रकाशन

विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६

दूरध्वनी (०७२१) २५७११०३

◈ **मूल्य** ४० रुपये

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शारीरिक | शालिनी | शासित | शास्त्रीय | शाहिरी |
| शाहीर | शिथिल | शिबिर | शिरीष | शिवीगाळ |
| शिक्षित | शीघ्रकवी | शीतल | शीतोष्ण | शीर |
| शील | शीलवंत | शुकशुकाट | शुद्धिपत्र | शुद्ध/शुद्ध |
| शुश्रूषा | शूद्र | शून्य | शूर | शेंदूर |
| शेंबूड | शोचनीय | शोषित | शौकीन | श्रमिक |
| श्रीपती | श्रीफल | श्रीमंत | श्रीयुत | श्रुती |

**ष**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| षट्क | षडानन | षष्ट्यब्दीपूर्ती | षष्ठी | षोडशी |

**स**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सक्रिय | सगुण | सचिव | सजीव | सणासुदी |
| सत्ताधीश | सत्त्व | सदाशिव | सद्गुणी | सन्मानित |
| सबुरी | समकालीन | समर्पित | समाविष्ट | समिती |
| समिधा | समीकरण | समीप | समीर | समीक्षण |
| समुदाय | समुद्र | समूह | सरिता | सरोजिनी |
| सर्वांगीण | सविता | सविस्तर | सहस्र | सहस्रबुद्धे |
| सहानुभूती | सहायक | सहित | सहिष्णू | संकीर्ण |
| संकुचित | संगीत | संग्रहित | संघटित | संजीवनी |
| संतुष्ट | संदिग्ध | संधिसाधू | संपादित | संपूर्ण |
| संमिश्र | संयमित | संयुक्त | संयोगिता | संयोजित |
| संस्कृती | संस्थानिक | साजूक | सात्त्विक | साप्ताहिक |
| साबूदाणा | सामाजिक | सामील | सामुदायिक | सावित्री |
| साहजिक | साहित्यिक | साक्षीदार | सिद्धी | सीता |
| सीमांतपूजन | सुखरूप | सुखासीन | सुगंधित | सुदर्शन |
| सुधारित | सुधीर | सुनीता | सुनील | सुपीक |
| सुपुत्र | सुभाषित | सुरळीत | सुरक्षित | सुवासिनी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | वर्गीकरण | वर्गीय | वर्जित | वर्णनीय |
| वर्तणूक | वर्तूळ | वशिला | वशीकरण | वसतिगृह |
| वसुधा | वसूल | वस्ती | वस्तुस्थिती | वहिनी |
| वहिवाट | वंचित | वंदनीय | वागणूक | वाटिका |
| वाढदिवस | वाढीव | वाणिज्य | वायुपुत्र | वायू |
| वारूळ | वार्ताहर | वार्षिक | वाल्मीकी | वासुदेव |
| वास्तविक | वास्तुशांती | वाहतुक | वाहिनी | विकसित |
| विघटित | विचलित | विचित्र | विजातीय | विटीदांडू |
| विदीर्ण | विदुर | विदुषी | विदूषक | विद्यापीठ |
| विद्यार्थिगृह | विद्यार्थिनी | विद्यार्थी | विद्युत | विधिलिखित |
| विधी | विधुर | विनामूल्य | विनिमय | विनीत |
| विपरीत | विपुल | विभिन्न | विभूती | विरचित |
| विरहिणी | विरुद्ध | विलीन | विलीनीकरण | विवस्त्र |
| विवाहित | विविध | विशिष्ट | विशेषण | विशेषतः |
| विश्लेषण | विश्वकोष | विश्वामित्र | विष | विषण्ण |
| विषम | विषाद | विषुववृत्त | विस्कळीत | विस्तीर्ण |
| विहीण | विहीर | विक्षिप्त | वीज | वीट |
| वीणा | वीर्य | वृद्धिंगत | वृद्‌धी | वेशभूषा |
| वेश्यावृत्ती | वैकल्पिक | वैकुंठ | वैगुण्य | वैचारिक |
| वैदिक | वैमानिक | वैयक्तिक | वैवाहिक | वैशिष्ट्य |
| व्यक्तिचित्र | व्यक्तिमत्त्व | व्यतिरिक्त | व्यथित | व्यभिचारी |
| व्यवस्थित | व्याकुल | व्याकूळ | व्यावहारिक | व्यासपीठ |

**श**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शकुंतला | शक्तिमान | शक्ती | शतायुषी | शनिवार |
| शनी | शरच्चंद्र | शरीर | शशिकला | शहानिशा |
| शहीद | शापित | शाबीत | शाब्दिक | शामियाना |



# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

नोव्हेंबर १९९८ मध्ये माझे 'झटपट शुद्धलेखन' प्रकाशित झाले आणि अवघ्या सहा महिन्यांत आवृत्ती संपली. नव्याने सुधारणांसह नोव्हेंबर १९९९ मध्ये 'झटपट मराठी शुद्धलेखन' प्रकाशित झाले. जुलै २००० मध्ये त्याची द्वितीयावृत्ती काढावी लागली. 'ठळक शुद्धलेखन'ची पहिली आवृत्ती २००३ मध्ये, द्वितीयावृत्ती २००४ मध्ये आणि आता २०१४ मध्ये तिसरी आवृत्ती सादर करीत आहे.

अनेक वर्षे विनामूल्य शुद्धलेखनाचे प्रशिक्षण वर्ग घेतले. त्या दरम्यान या संदर्भातील सूचना, पुस्तकांवरील अभिप्राय आणि माझे अनुभव या सगळ्यांतून मीही नव्याने काहीतरी शिकत गेलो आणि म्हणून प्रत्येक पुस्तकात नवनवीन सुधारणा करीत गेलो. अत्यंत संक्षिप्त आणि आवश्यक असे नेमके मुद्दे असणारे शुद्धलेखनाचे पुस्तक हवे, ही अभ्यासकांची मागणी 'ठळक शुद्धलेखन' या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण केली.

मराठी साहित्य महामंडळाने तयार केलेली शुद्धलेखन नियमावली त्रोटक व क्लिष्ट स्वरूपात असल्याने नियमांचे विश्लेषण व आधारित मुद्दे यांचा अभ्यास सोप्या भाषेत मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

हे पुस्तक म्हणजे परिपूर्ण शुद्धलेखन नाही; पण शुद्धलेखनाच्या अभ्यासातील ठळक मुद्दे सर्वच स्तरावरील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि मराठी लेखन-वाचन करणाऱ्या सगळ्यांनाच उपयोगी पडतील अशी आशा आहे.

– पवन मांडवकर

# लक्षात असू द्या

❖ बोलताना काही शब्दांचा उच्चार आपण लांबट तर काहींचा आखूड तर काहींचा नाकातून करतो. या ऱ्हस्व-दीर्घ-सानुस्वार उच्चारांनुसार बोलणे म्हणजे *'शुद्ध बोलणे'* तर त्याच पद्धतीने लिहिणे म्हणजे *'शुद्धलेखन'*. हे लेखन बिनचूक व शुद्ध असावे याकरिता जे नियम आहेत, त्यांना *'लेखनविषयक नियम'* किंवा *'शुद्धलेखनाचे नियम'* असे म्हणतात. शुद्धलेखन हा व्याकरणाचाच एक भाग असल्याने व्याकरणातील नियमांना अनुसरून केलेले लेखन म्हणजे *'शुद्धलेखन'* असेही म्हणता येईल.

❖ **वर्णमाला** / **मुळाक्षरे**

❖ **वर्ण –** तोंडातून निघणारे जे मूळचे ध्वनी त्यांना *'मूलध्वनी'* किंवा *'वर्ण'* असे म्हणतात. वर्ण दोन प्रकारचे असतात - स्वर आणि व्यंजने.

❖ **स्वर –** दुसऱ्या वर्णांच्या मदतीशिवाय ज्यांचा उच्चार स्वतंत्रपणे होऊ शकतो, त्या वर्णांना *'स्वर'* असे म्हणतात.

अ आ इ ई उ ऊ ऋ लृ ए ऐ ओ औ

हे स्वर असून अं (अनुस्वार) व अः (विसर्ग) यांना *'स्वरादी'* म्हणतात. त्यांना स्वरादी म्हणण्याचे कारण असे की, त्यांच्या आरंभी कोणता तरी स्वर आल्याखेरीज त्यांचा उच्चार करता येत नाही.

उदा. - *अंक* - या शब्दात अनुस्वारापूर्वी 'अ' हा स्वर आहे.

*दुःख* - या शब्दात विसर्गापूर्वी 'उ' हा स्वर आहे.

❖ स्वरांची ऱ्हस्व व दीर्घ स्वरांमध्ये विभागणी करता येते. त्यानुसार त्यांची ऱ्हस्व व दीर्घ चिन्हे तयार होतात.

❖ **ऱ्हस्व स्वर –** ज्या स्वरांचा उच्चार आखूड किंवा लहान होतो, ते ऱ्हस्व स्वर. अ, इ ( ि लहान वेलांटी), उ ( ु लहान उकार) हे



## य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| यजुर्वेद | यत्किंचित | यथोचित | यद्यपि | यमुना |
| यामिनी | यांत्रिक | युग | युधिष्ठिर | युवक |
| योगिनी | योगिराज | योगी | योजित | योनी |

## र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रकमेची | रक्कम | रखरखीत | रचित | रजिस्टर |
| रणधीर | रणभूमी | रमणीय | रविवार | रवी |
| रसिक | रसीद | रहिवासी | रंगीत | राखीव |
| रागिणी | रागीट | राजकीय | राजनीती | राजीनामा |
| राजीव | राज्याभिषेक | रात्रंदिवस | राशिचक्र | राशी |
| राष्ट्रीय | रिक्त | रिक्षा | रिबीन | रिमझिम |
| रीती | रीळ | रुक्मिणी | रुग्णालय | रुची |
| रुणुझुणु | रुपया | रुपेरी | रूढी | रूप |
| रूक्ष | रेखीव | रेडिओ | रेणुका | रेणू |
| रोमांचित | रोहिणी | रोहित | ऱ्हस्व | ऱ्हास |

## ल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लघुतम | लज्जित | लतिका | ललित | लवचिक |
| लसूण | लक्षणीय | लक्षाधीश | लक्ष्मीपूजन | लाकूड |
| लाजिरवाणा | लाडिकपणा | लाडीगोडी | लालित्य | लालूच |
| लिखित | लिपी | लिहिणे | लिंग | लीला |
| लुटारू | लुटुलुटु | लुटूपुटू | लुडबूड | लूट |
| लेकुरवाळा | लेखनिक | लेजीम | लोहचुंबक | लौकिक |

## व

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वकिली | वकील | वक्तशीर | वक्तृत्व | वक्रतुंड |
| वजीर | वटसावित्री | वटहुकूम | वडिलार्जित | वडील |
| वतीने | वधू | वधूवर | वरिष्ठ | वरुण |

## म

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मचूळ | मजकूर | मजबुती | मजबूत | मठाधीश |
| मताधिकार | मतिमंद | मती | मत्स्याहारी | मथितार्थ |
| मदतनीस | मधुचंद्र | मधुमेह | मधुर | मधुसूदन |
| मधू | मध्यान्ह | मनःकामना | मनःपूर्वक | मनःशांती |
| मनःस्थिती | मनीषा | मनू | मनोविकार | मनोवृत्ती |
| मयूरी | मरुभूमी | मर्तीक | मर्दुमकी | मर्यादित |
| मल्लिकार्जुन | मल्लिनाथी | मशीद | मसुदा | महाराष्ट्रीय |
| महर्षी | महालक्ष्मी | महावीर | महाशिवरात्री | महिना |
| महिमा | महिला | महीपाल | मंगलमूर्ती | मंगळसूत्र |
| मंजिरी | मंजूर | मंजूषा | मंजूळ | मंत्री |
| मंदस्मित | मंदिर | मंदी | माणिक | माणुसकी |
| माणूस | मातृभूमी | माधुकरी | माधुरी | माननीय |
| मानसिक | मानिनी | मामुली | मारपीट | मारुती |
| मार्मिक | मालिनी | मालिन्य | मालूम | मासिक |
| माहात्म्य | माहिती | माहीत | माहूत | मांत्रिक |
| मिथुन | मिनिटे | मिरवणूक | मिलन (भेट) | मिलिंद |
| मिष्टान्न | मिस्कील | मीमांसा | मीलन (मिटणे) | मुकुट |
| मुक्तच्छंद | मुक्ती | मुखपृष्ठ | मुजुमदार | मुत्सद्दी |
| मुद्रित | मुनीम | मुमुक्षू | मुलूख | मुश्कील |
| मुष्टियुद्ध | मुहूर्त | मुळूमुळू | मुंगूस | मूढ |
| मूत्रपिंड | मूत्राशय | मूर्च्छा | मूर्तिमंत | मूर्ती |
| मूर्धन्य | मूल्यवान | मूषक | मूळव्याध | मृत्युपत्र |
| मृत्यू | मृदू | मेघश्याम | मेहुणी | मैत्रीण |
| मैथुन | मोकळीक | मोतीचूर | मोतीबिंदू | मोरपीस |
| मोलकरीण | मोहरी | मोहित | मोहिनी | मोहीम |



मराठीतील ऱ्हस्व स्वर आहेत.

❖ **दीर्घ स्वर** – ज्या स्वरांचा उच्चार लांबट होतो, ते दीर्घ स्वर. आ ( ा काना), ई ( ी मोठी वेलांटी), ऊ ( ू मोठा ऊकार) ए ( े एक मात्रा), ऐ ( ै दोन मात्रा), ओ ( ो एक काना, एक मात्रा), औ ( ौ एक काना, दोन मात्रा), अं ( ं अनुस्वार), अः ( ः विसर्ग)

❖ **व्यंजने** – दुसऱ्या वर्णांच्या मदतीशिवाय ज्यांचा उच्चार पूर्ण होऊ शकत नाही, त्या वर्णांना 'व्यंजने' असे म्हणतात.

क् ख् ग् घ् ङ्    च् छ् ज् झ् ञ्

ट् ठ् ड् ढ् ण्    त् थ् द् ध् न्

प् फ् ब् भ् म्    य् र् ल् व् श्

ष् स् ह् ळ् क्ष् ज्ञ्

वर्णमालेतील शेवटचे दोन वर्ण संयुक्त व्यंजने आहेत.

क्ष् = क् + ष्    ज्ञ् = द् + न् + य्

दोन किंवा अधिक व्यंजने एकत्र आल्यास त्यांना *संयुक्त व्यंजने* म्हणतात.

व्यंजने अपूर्ण असल्याने लिहिताना त्यांचा पाय तोडला जातो. त्यांच्यात जेव्हा स्वर मिसळला जातो, तेव्हा ती पूर्णोच्चारी होतात.

उदा. – क = क् + अ    मी = म् + ई

❖ **अनुनासिके / अनुस्वार** – नासिकेतून (नाकातून) उच्चार होणाऱ्या वर्णांना *अनुनासिक वर्ण* म्हणतात. ङ्, ञ्, ण्, न्, म् हे अनुनासिक वर्ण आहेत. अनुनासिके दर्शविण्यासाठी अक्षरांच्या डोक्यावर एक बिंदू दिला जातो, त्याला अनुस्वार असे म्हणतात.

उदा. – अंक, आंबा, चंदन, बंधू, मंदार

❖ **अन्त्याक्षर व उपान्त्याक्षर –** शब्दाच्या शेवटी येणाऱ्या अक्षराला अन्त्याक्षर तर अन्त्याक्षरापूर्वी येणाऱ्या अक्षराला उपान्त्याक्षर असे म्हणतात. उदा. – 'शरद' या शब्दात 'द' हे अन्त्याक्षर तर 'र' हे उपान्त्याक्षर आहे.

'शरद' या शब्दाच्या अन्ती (द् + अ) 'अ' हा स्वर येतो, म्हणून हा 'अकारान्त' शब्द आहे. आणखी उदाहरणे पहा.

| | |
|---|---|
| अजय, कमळ, जीव - अकारान्त, | जा, निळा, माता - आकारान्त, |
| आणि, नि, तथापि - इकारान्त, | आई, गाडी, पाणी - ईकारान्त |
| परंतु, किंतु - उकारान्त, | काळू, खाऊ, भाऊ - ऊकारान्त |
| आले, गेले, काळे - एकारान्त. | आलो, गेलो, पडलो - ओकारान्त |

❖ **तत्सम व तद्भव शब्द –** (अन्य भाषांतून) संस्कृतमधून जसेच्या तसे जे शब्द आले आहेत, त्यांना तत्सम तर बदल होऊन आलेल्या शब्दांना तद्भव शब्द म्हटले जाते.

❖ **तद्धित शब्द –** प्रत्यय लागून तयार झालेल्या शब्दांना तद्धित शब्द म्हटले जाते. उदा. – अलीकडे, गाडीवाला, भाजीपाला.

❖ **पर–सवर्ण –** व्यंजनांच्या वर्गातील अनुनासिक म्हणजे पर-सवर्ण. हे वर्गात पाचव्या क्रमांकावर येतात, म्हणून त्यांना 'पंचमवर्ण' असेही म्हणतात. ङ्, ञ्, ण्, न्, म् हे मराठीतील पर-सवर्ण आहेत.

❖ **सामान्यरूप –** विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यास तयार झालेले अंगचे रूप म्हणजे सामान्यरूप.
उदा. – 'नदीचा' या शब्दात 'नदी' तर 'नद्यांचा' या शब्दात 'नद्या' हे सामान्यरूप आहे.

❖ **शब्दयोगी अव्यय –** वाक्यातील इतर शब्दांशी नामांचा व सर्वनामांचा संबंध दाखविणाऱ्या अव्ययांना शब्दयोगी अव्यय म्हणतात.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| फाईल | फाजील | फाटाफूट | फिकीर | फितुरी |
| फितूर | फिरकी | फिल्म | फी | फीत |
| फुटीर | फुफ्फुस | फुलपाखरू | फुशारकी | फुंकर |

## ब

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बकुल | बगिचा | बडीशेप | बत्तिशी | बत्तीस |
| बरणी | बलिदान | बलिप्रतिपदा | बलिष्ठ | बहादूर |
| बहिर्मुखी | बहिष्कार | बहीण | बहुगुणी | बहुरूपी |
| बहुश्रुत | बक्षीस | बंदिस्त | बंदूक | बाजीराव |
| बातचीत | बातमीदार | बारीकसारीक | बालवीर | बालिका |
| बांधीलकी | बिरबल | बिंदू | बीजगणित | बीभत्स |
| बीळ | बुडीत | बुद्धिमान | बुद्धी/द्धी | बुबूळ |
| बुरूज | बेइज्जत | बेइमान | बेचिराख | बेछूट |
| बेडूक | बेपर्वाई | बेफिकिरी | बेफिकीर | बेमालूम |
| बेवकूब | बेहोशी | ब्रम्ह | ब्राम्हण | ब्रीद |

## भ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भक्तिमार्ग | भक्ती | भगिनी | भडिमार | भयभीत |
| भरपूर | भरीव | भवितव्य | भविष्य | भस्मासुर |
| भक्ष्य | भाऊबीज | भाकीत | भागीदारी | भागीरथी |
| भागूबाई | भाजीपाला | भातुकली | भारतीय | भारूड |
| भाविक | भाषिक | भांडकुदळ | भित्तिपत्रक | भिवई |
| भिंत | भीड | भीती | भीमराव | भीषण |
| भीष्मप्रतिज्ञा | भुईमूग | भुताटकी | भुवई | भूकंप |
| भूगोल | भूत | भूदान | भूपती | भूपाळी |
| भूमिका | भूमिती | भूमी | भूषण | भेसूर |
| भौतिक | भौगोलिक | भ्रमिष्ट | भ्रष्टाचार | भ्रूण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पदच्युत | पदवीधर | परकीय | परंतु | पराजित |
| पराधीन | परामर्श (विचार) | परामर्ष (राग) | परिचय | परिच्छेद |
| परिणीत | परिपत्रक | परिपूर्ण | परिमल | परिषद |
| परिसर | परिस्थिती | परीस | परीक्षण | परीक्षा |
| परिक्षित | पर्णकुटी | पलीकडे | पवित्र | पश्चात्ताप |
| पश्चिम | पक्षी | पंचविशी | पंचशील | पंचाईत |
| पंडित | पाऊस | पाकीट | पाटील | पाठिंबा |
| पाणीदार | पादुका | पानसुपारी | पायगुण | पारंपरिक |
| पारमार्थिक | पारिजात | पारितोषिक | पार्थिव | पालुपद |
| पाश्चिमात्य | पाहिजे | पाहुणा | पाळीव | पाक्षिक |
| पिशवी | पिस्तूल | पिंकी | पिंगा | पीक |
| पीठिका | पीडा | पीडित | पीतांबर | पीयूष |
| पुजारी | पुण्यतिथी | पुण्याई | पुनःपुन्हा | पुनश्च |
| पुरुषार्थ | पुरेपूर | पुरोगामी | पुरोहित | पूजा |
| पूरक | पूर्णिमा | पूर्तता | पूर्वज | पृथक्करण |
| पृथ्वी | पेन्सिल | पोशाख | पॉलिसी | पौराणिक |
| प्रकाशित | प्रकृती | प्रचिती | प्रचीत | प्रचुर |
| प्रतिकूल | प्रतिनिधी | प्रतिभा | प्रतिमा | प्रतिष्ठित |
| प्रतिज्ञा | प्रतीक | प्रतीती | प्रतीक्षा | प्रदक्षिणा |
| प्रदीप | प्रदूषित | प्रफुल्लित | प्रवीण | प्रवृत्ती |
| प्रशंसनीय | प्रशस्तिपत्रक | प्रशस्ती | प्रसिद्धी | प्रसूती |
| प्रस्तुत | प्रस्थापित | प्राकृतिक | प्राचीन | प्राणी |
| प्रात्यक्षिक | प्राथमिक | प्रादेशिक | प्रामाणिक | प्रार्थनीय |
| प्रावीण्य | प्रास्ताविक | प्रीती | प्रेक्षणीय | प्रोत्साहित |

### फ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फकीर | फजिती | फलश्रुती | फलित | फसवणूक |



उदा. - झाडाखाली, घरावर, येण्यापूर्वी या शब्दांमध्ये खाली, वर, पूर्वी ही शब्दयोगी अव्यये आहेत.

❖ **पुनरुक्त व अभ्यस्त शब्द –** शब्दांची पुनरुक्ती झाल्यास पुनरुक्त तर वर्णांची, अक्षरांची त्याच क्रमाने आवृत्ती होऊनही तोच शब्द पुन्हा येत नसल्यास त्यास अभ्यस्त शब्द म्हणतात.

उदा. - जाता जाता, हसत हसत, बोलता बोलता हे पुनरुक्त शब्द तर नासधूस, घोडाबिडा, शेतीभाती हे अभ्यस्त शब्द आहेत.

# शुद्धलेखनाचे नियम आणि इतर मुद्दे

## अनुस्वार

(अधोरेखित केलेले मुद्दे मराठी साहित्य महामंडळाने मंजूर केलेले आहेत.)

१. स्पष्टोच्चारित अनुनासिकांबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

उदा. अंतिम, आंबा, उंच, कंद, छंद, भिंत, मंदिर.

२. संस्कृतमधून आलेल्या तत्सम शब्दांत अनुनासिकांबद्दल विकल्पाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

उदा. गङ्गा, पण्डित, चम्पक, घण्टा.

परंतु नेमका कोणता पर-सवर्ण वापरावा, याचा गोंधळ टाळण्यासाठी (अर्थ बदलत नसेल तर) अनुस्वाराचाच उपयोग योग्य ठरतो.

३. अनुस्वार दिल्यामुळे जर शब्दाच्या दोन अर्थांमध्ये घोटाळा होत असेल तर पर-सवर्ण वापरावा.

उदा. - देहांत (अनेक देहांत), देहान्त (मरण), कलांत - कलान्त, शालांत - शालान्त, वेदांत (अनेक वेदग्रंथांमध्ये) - वेदान्त (तत्त्वज्ञान), वृत्तांत

(अनेक बातम्यांमध्ये) - वृत्तान्त (हकिगत), सुखांत - सुखान्त, सिद्धांत (अनेक सिद्ध पुरुषांमध्ये) - सिद्धान्त (तत्त्व, निष्कर्ष)

४. य्, र्, ल्, व्, श्, स्, ह्, ज्ञ् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुनासिकांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.

उदा. - सिंह, संयम, संलग्न, संरक्षण, संवाद, संशय, संज्ञा.

आपण या शब्दांचा उच्चार सिंव्ह, संय्यम, संव्शय, संव्लग्न, संव्रक्षण, संव्वाद, संव्ज्ञा असा करतो; परंतु अनुस्वाराचा उच्चार पूर्ण व स्पष्ट केला की आपोआप 'य्', 'व्' उच्चारले जातात. म्हणून ते न लिहिता केवळ अनुस्वार द्यावा.

५. नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.

उदा. - त्याचा - त्यांचा, घरात - घरांत, देशासाठी - देशांसाठी, मुलास - मुलांस.

६. आदरार्थी बहुवचनाच्या वेळीही अनुस्वार द्यावा.

उदा. - आपणांस, गुरुजींनी, राष्ट्रपतींना, गांधीजींनी, वडिलांना.

७. जाताना, येताना, बोलताना, खेळताना, खाताना, गाताना, सांगताना अशा शब्दांतील 'ता' या अक्षरावर अनुस्वार देऊ नये.

▣▣▣

# ऱ्हस्व-दीर्घ

८. मराठीतील तत्सम इकारान्त व उकारान्त शब्द प्रथमेत दीर्घान्त लिहावे.

उदा. - कवी, मती, गती, गुरू, वायू, पशू, शिशू.

९. तत्सम नसलेल्या शब्दांच्या अंती येणारा इकार, उकार दीर्घ लिहावा.

उदा. - आई, टोपी, पाटी, विनंती, दाढी, कडू, चेंडू, जादू, दांडू, खेळू.



## ध

| | | | | |
|---|---|---|---|---|
| धटिंगण | धनिक | धनी | धनुर्धारी | धनुर्वात |
| धनुर्विद्या | धनुष्य | धन्वंतरी | धरणीकंप | धष्टपुष्ट |
| धाकधूक | धातुसाधित | धातू | धामधूम | धारिष्ट |
| धार्जिणा | धार्मिक | धिंड | धीट | धीरोदात्त |
| धुडगूस | धुमश्चक्री | धुमाकूळ | धूप | धूम्रपान |

## न

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नकुल | नगरपालिका | नजीक | नपुंसक | नमुना |
| नमूद | नरकचतुर्दशी | नवीन | नशीबवान | नक्षीदार |
| नंदिनी | नाइलाज | नागरिक | नागीण | नाजूक |
| नाटिका | नाडीपरीक्षा | नातेवाईक | नामांकित | नायिका |
| नावलौकिक | नाविक | नावीन्य | नास्तिक | नि |
| निकष | निष्काळजी | निकृष्ट | निखिल | निगडित |
| निपचीत | निपुत्रिक | निमंत्रित | निमित्त | निमूटपणे |
| नियतकालिक | नियमित | नियंत्रित | नियुक्त | निरभ्र |
| निरंकुश | निरीक्षण | निरूपण | निर्गुण | निर्जीव |
| निर्णीत | निर्धारित | निर्भय | निर्भर्त्सना | निर्भीड |
| निर्मित | निर्मूलन | निर्लज्ज | निर्विकार | निर्व्यसनी |
| निवडणूक | निवृत्ती | निश्चित | निषिद्ध | निषेध |
| निष्कर्ष | निष्कलंक | निष्क्रिय | निष्ठा | निष्ठुर |
| निष्णात | निष्प्रभ | निंदनीय | निःपक्षपात | निःशंक |
| निःश्वास | निःसंतान | नीतिमान | नीती | नीरव |
| नीरस | नीलकंठ | नीलिमा | नीळ | नूतन |
| नूपुर | नेमणूक | नैतिक | नैसर्गिक | न्यायाधीश |

## प

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पटाईत | पडीक | पढीक | पतिव्रता | पत्रिका |

## त

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तक्क्या | तहकूब | तडतडीत | तत्त्व | तत्पुरुष |
| तथापि | तपशील | तपस्वी | तपासणी | तब्येत |
| तमासगीर | तरुण | तल्लीन | तसबीर | ताकीद |
| तात्काळ | तात्त्विक | तारीख | तिकीट | तिजोरी |
| तिमाही | तिरस्कार | तिऱ्हाईत | तिळगूळ | तुरुतुरु |
| तुरुंग | तुषार | तूप | तृतीय | तृप्त |
| तृष्णा | त्रिकूट | त्रिकोण | त्रिज्या | त्रिभूवन |
| त्रिमूर्ती | त्रिविध | त्रिवेणी | त्रैमासिक | त्वरित |

## थ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| थर्मामीटर | थालीपीठ | थिएटर | थुंकी | थैली |

## द

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दडपशाही | दणदणीत | दरिद्री | दर्दी | दर्पोक्ती |
| दर्शनीय | दलित | दस्तऐवज | दक्षिण | दंडनीय |
| दागिना | दाजीबा | दानशूर | दारिद्र्य | दारुण |
| दारूबंदी | दार्शनिक | दासीपुत्र | दाक्षिणात्य | दांभिक |
| दिग्विजय | दिरंगाई | दिलखुलास | दिलगिरी | दिलगीर |
| दिवाळी | दिशाभूल | दीडशहाणा | दीपक | दीपावली |
| दीपिका | दीप्ती | दीर्घायुषी | दीक्षा | दीक्षित |
| दुडुदुडु | दुनिया | दुय्यम | दुराग्रही | दुरापास्त |
| दुर्गुण | दुर्दैवी | दुर्बीण | दुर्मिळ | दुर्लक्षित |
| दुर्वास | दुर्व्यसनी | दुष्काळ | दुष्कीर्ती | दुःशासन |
| दूधदुभते | दूरदर्शी | दूरध्वनी | दूर्वा | दूर्वांकुर |
| दूषित | दृश्य | दृष्ट | देखील | देवदूत |
| दैनंदिनी | दैनिक | द्वंद्वयुद्ध | द्विगुणित | द्वीप |



अपवाद - नि, आणि, तथापि, यथामति, परंतु, किंतु अशी उभयान्वयी/तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी.

१०. व्यक्तिनामे, ग्रंथनामे, शीर्षके, सुटे तत्सम ई-कारान्त, ऊ-कारान्त शब्दही मराठीत दीर्घान्त लिहावे.

उदा. - हरी, मनुस्मृती, कृषी, संधी, अन्योक्ती, विभक्ती, कुलगुरू.

११. सामासिक शब्दांत तत्सम ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपदी असताना ऱ्हस्वान्तच लिहावे.

उदा. - कविमन, मतिमंद, गतिशील, बुद्धिवैभव, हरिकृपा, पशुपक्षी, शिशुविहार, वायुपुत्र, लघुकथा, रविवार, शत्रुपक्ष, मृत्युकाल, लघुतम, विद्यार्थिगृह, प्राणिसंग्रह, पक्षिगण, गुणिजन, योगिराज, स्वामिभक्त.

१२. सामासिक व साधित शब्दांत पहिले पद दीर्घ ई-कारान्त किंवा दीर्घ ऊ-कारान्त संस्कृत शब्द असेल, तर ते मुळाप्रमाणे दीर्घान्तच लिहावे.

उदा. - पृथ्वीतल, वधूपरीक्षा, लक्ष्मीपुत्र, महीपाल, नदीतीर, भूगोल, दासीजन, श्रीधर, वधूवर, भगिनीमंडळ, शरयूतीर, गौरीहर, रजनीकांत.

१३. सामासिक, अभ्यस्त अथवा पुनरुक्त शब्दांतील घटकशब्द स्वतंत्र मानून ते उच्चारानुसार ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहावे.

उदा. - आईबाप, गडीमाणसे, दूधदुभते, विटीदांडू, भाजीभाकरी, दाढीमिशी, दारूकाम, आनंदीआनंद, शेतीभाती, गाणीबजावणी, वेणीफणी, भेटीगाठी, घाईघाई, हळूहळू, मुळूमुळू.

१४. अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार, उकार दीर्घ लिहावे.

उदा. - खीर, कठीण, विहीर, दीर, नीट, बहीण, जमीन, गरीब, वीट, टीप, खून, खूण, सून, फूल, पूर, मूल, वसूल, ऊस, शूर, मुंगूस.

अपवाद - *काही तत्सम शब्द* - गुण, युग, बुध, सुख, मधुर, तरुण, कुसुम, अनिल, मंदिर, हिम, रसिक, नागरिक, सामाजिक, प्रिय, पंडित, शिव.

१५. मराठी शब्दांतील अनुस्वारापूर्वीचे इकार, उकार ऱ्हस्व लिहावे.
उदा. - भिंग, सुंठ, खुंटी, उंच, चिंच, पिंड, हिंद, भिंत, बिंदू, धिंड.
१६. मराठी शब्दांतील विसर्गापूर्वीचे इकार, उकार ऱ्हस्व लिहावे.
उदा. - दुःख, निःपक्ष, निःसत्त्व, दुःसाध्य, निःशंक, दुःशासन, दुःस्थिती.
१७. मराठी शब्दांतील जोडाक्षरांपूर्वीचे इकार, उकार ऱ्हस्व लिहावे.
उदा. - इष्ट, विशिष्ट, शिस्त, शिष्ट, कुस्ती, मुक्काम, सुस्त.
१८. तत्सम शब्दांतील जोडाक्षरांपूर्वीचे इकार, उकार मुळाप्रमाणे लिहावे.
उदा. - पुण्य, चरित्र, कनिष्ठ, भिल्ल, तीक्ष्ण, सूक्ष्म, पूज्य, धूम्र, प्रतीक्षा, भीष्म, परीक्षा, ग्रीष्म.
१९. ई-कारान्त व ऊ-कारान्त दीर्घ शब्दांतील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावे.
उदा. गिरी, गरिबी, माहिती, भूमिती, हुतुतू, सुरू, विष्णू.
अपवाद - दीर्घोपान्त्य तत्सम शब्द.
उदा. - नीती, रीती, कीर्ती, प्रीती, दीप्ती, पूर्ती, मूर्ती, स्फूर्ती.
२०. उपान्त्य दीर्घ ई, ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ईकार, ऊकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा.
उदा. गरीब - गरिबांस, सून - सुनेला, नागपूर - नागपुरास, वकील - वकिलांना, वीट - विटांचे, मूल - मुलांना, चूल - चुलीमध्ये, जीव - जिवाला ('मन', 'प्राण' या अर्थाने).
अपवाद - दीर्घोपान्त्य तत्सम शब्द.
उदा. - शरीर - शरीरास, गीता - गीतेत, सूत्र - सूत्रात, जीव - जीवास ('प्राणी' या अर्थाने).
२१. एकाक्षरी मराठी इकार, उकार दीर्घ लिहावे.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| चिंतातुर | चीज | चुणूक | चुकभूल | चेटूक |

**ज**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जख्खड | जटायू | जटिल | जडवाहीर | जणूकाही |
| जन्मतिथी | जन्मभूमी | जपणूक | जमीनदार | जरूर |
| जवळीक | जळीत | जंजीर | जागतिक | जागरूक |
| जागृती | जाणीव | जाणूनबुजून | जातीय | जादूगार |
| जाहिरात | जाहीरनामा | जितेंद्रिय | जिलबी | जिल्हा |
| जिवलग | जिवंत | जिवाणू | जिवापाड | जिव्हाळा |
| जिज्ञासा | जीव | जीवन | जुलूम | जोखीम |
| जोगिया | ज्युबिली | ज्येष्ठ | ज्योतिषी | ज्योत्स्ना |

**झ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झगमगीत | झणझणीत | झीज | झुडूप | झुणका |
| झुरळ | झुळूक | झुंजूमुंजू | झुंबर | झोळी |

**ट**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टकळी | टवाळी | टाईप | टाकाऊ | टापटीप |
| टिकली | टिकाऊ | टिच्चून | टिटवी | टिपूस |
| टिळा | टीका | टीप | टुकटुक | टुणकन |
| टुमदार | टुरटूर | टेलिफोन | टेहळणी | टेंगूळ |

**ठ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठरावीक | ठाऊक | ठिगळ | ठिसूळ | ठीक |

**ड**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डावखुरा | डाळिंब | डिक्शनरी | डिस्ट्रिक्ट | डिंक |
| डुगडुगी | डुलकी | डेप्युटी | डॅबिस | ड्रॉइंग |

**ढ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ढिगारा | ढिलाई | ढुशी | ढेकूण | ढोलकी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कदाचित | कनिष्ठ | कमिशन | करुण | कलंकित |
| कलियुग | कलुषित | कल्पित | कवी | कंजूष |
| कंदील | कापूस | कामिनी | कामुक | कारकीर्द |
| कारखानीस | कारभारीण | कार्तिकी | कार्यकारिणी | काल्पनिक |
| कावीळ | काश्मीर | काहीतरी | काळवीट | काळीज |
| किंबहुना | किल्मिष | किंतु | कीर्तन | कीर्तिमान |
| कीर्ती | कीव | कुजबूज | कुटिल | कुटुंब |
| कुलगुरू | कुलीन | कुलूप | कुसुम | कुंकू |
| केविलवाणा | कोट्यधीश | कोथिंबीर | कौतुक | क्वचित |

## ख

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खजिनदार | खजील | खजूर | खडीसाखर | खणखणीत |
| खंजिरी | खंजीर | खंडित | खाणावळ | खारीक |
| खीर | खुनशी | खून (मारणे) | खूण (चिन्ह) | खुसखुशीत |

## ग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गढूळ | गणपती | गणवेश | गणिका | गणित |
| गती | गनिमी | गनीम | गरिबी | गरीब |
| गर्विष्ठ | गलिच्छ | गालिचा | गांभीर्य | गिरिजा |
| गिरीश | गिऱ्हाईक | गीता | गुढीपाडवा | गुण |
| गुपचूप | गुपित | गुरुकिल्ली | गुरुकुल | गुलामगिरी |
| गुंतवणूक | गृहिणी | गृहीत | ग्रामीण | ग्लानी |

## घ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| घनश्याम | घनिष्ठ | घरकूल | घवघवीत | घोषित |

## च

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चकित | चक्रव्यूह | चतुर | चतुरस्र | चतुर्भुज |
| चमत्कारिक | चरित्र | चविष्ट | चषक | चंद्रिका |
| चातुर्वर्ण्य | चाबूक | चिकित्सक | चिरायू | चिंतनीय |



उदा. - मी, ही, जी, ती, की, पी, तू, पू, धू.

अपवाद - नि (उभयान्वयी अव्यय).

२२. मराठी शब्दांतील अन्त्याक्षर दीर्घ स्वरान्त असेल तर उपान्त्य इकार, उकार ऱ्हस्व लिहावे.

उदा. - दिवा, किडा, हिरा, सरिता, गुणी, सुरी, पाहिजे, दिले.

अपवाद - तत्सम शब्दांतील उपान्त्याक्षरे दीर्घ ईकार किंवा दीर्घ ऊकार असतील तर ती मूळ संस्कृतातल्याप्रमाणे दीर्घ लिहावी.

उदा. - भीती, नीती, प्रतीती, कीर्ती, लीला, पीडा, क्रीडा, परीक्षा, चूर्ण, पूर्ण, पूर्व, पूजा, दीक्षा, समीक्षा.

▣▣▣

# किरकोळ/अन्य

२३. 'पूर' हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा.

उदा. - नागपूर, रायपूर, शिंगणापूर, कोल्हापूर, सोलापूर.

ग्रामनामाच्या सामान्यरूपाच्या वेळी 'पूर'मधील 'पू' ऱ्हस्व 'पु' करावा.

उदा. - नागपुरात, रायपुरास, शिंगणापुरातून, कोल्हापुरी.

२४. कोणता, एखादा ही रूपे लिहावी. कोणचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

२५. हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

आणखी उदा. - तसूतसू, चुटूपुटू, कधीकधी, मधूनमधून, बारीकसारीक, दूरदूर अशा पुनरुक्त/अभ्यस्त शब्दांतील घटकशब्द मूळ उच्चारानुसार लिहावे. हेच अभ्यस्त किंवा पुनरुक्त शब्द नादानुकारी असतील तर ते

उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे.

उदा. - रुणुझुणु, लुटुलुटु, दुडुदुडु, झुळुझुळु, तुरुतुरु.

२६. ए-कारान्त नामाचे सामान्यरूप या-कारान्त करावे.

उदा. - करणे - करण्यासाठी, पाहणे - पाहण्यास, आमचे - आमच्याकडे, त्यांचे - त्यांच्याशी, फडके - फडक्यांना (शक्यतो 'फडके यांना' असे लिहावे.) अशा रूपांऐवजी करणेसाठी, फडकेंना, पाहणेला अशी ए-कारान्त सामान्यरूपे करू नयेत.

२७. लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्यावेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे करू नये.

२८. क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान इत्यादी मराठीत रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावे. म्हणजे अशा शब्दांतील शेवटच्या अक्षराचा पाय तोडू नये.

२९. केशवसुतपूर्वकालीन पद्य व विष्णुशास्त्री चिपळूणकरकालीन गद्य यांतील उतारे छापताना ते मुळानुसार छापावे. नंतरचे लेखन (केशवसुत व चिपळूणकर यांच्या लेखनासह) मराठी साहित्य महामंडळाच्या प्रस्तुत लेखनविषयक नियमांस अनुसरून लिहावे.

३०. राहणे, पाहणे, वाहणे अशी रूपे वापरावी. रहाणे-राहाणे, पहाणे-पाहाणे अशी रूपे वापरू नये. आज्ञार्थी प्रयोग करताना 'राहा, पाहा, वाहा' यांबरोबरच 'रहा, पहा, वहा' ही रूपे वापरण्यास हरकत नाही.

३१. 'इत्यादी', 'ही' (अव्यय) हे शब्द दीर्घान्त लिहावे. 'अन्' ('आणि', 'नि' या अर्थाने) हा शब्द व्यंजनान्त लिहावा. (म्हणजे 'न'चा पाय तोडावा.) 'ही' नेहमी जोडूनच लिहावा. उदा. - तूही, मीही, तुम्हीही, कोणीही.



### ई

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ईडलिंबू | ईद | ईर्षा | ईशान्य | ईश्वर |

### उ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उकिरडा | उचित | उच्चारित | उच्छाद | उच्छृंखल |
| उज्ज्वल | उडीद | उणीव | उत्कर्ष | उत्कंठित |
| उत्कृष्ट | उत्क्रांती | उत्खनन | उत्तरीय | उत्तीर्ण |
| उत्तुंग | उत्तेजित | उत्थापन | उत्पत्ती | उत्साहित |
| उत्सुक | उदरनिर्वाह | उदासीन | उदाहरण | उद्‌घोषित |
| उद्दिष्ट | उद्देश | उद्देश्य | उद्‌धृत | उद्‌ध्वस्त |
| उद्युक्त | उद्विग्न | उन्नती | उन्मूलन | उपजीविका |
| उपद्‌व्याप | उपनिषद | उपस्थिती | उपाहारगृह | उपोषण |
| उर्वरित | उल्लेखित | उषःकाल | उषा | उष्ण |

### ऊ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऊठ | ऊर | ऊर्जा | ऊस | ऊहापोह |

### ऋ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऋग्वेद | ऋचा | ऋणानुबंध | ऋतू | ऋषी |

### ए

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकजूट | एकनिष्ठ | एकांकिका | एकूण | एप्रिल |

### ऐ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऐकीव | ऐच्छिक | ऐतखाऊ | ऐतिहासिक | ऐहिक |

### ओ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ओक्साबोक्शी | ओढणी | ओतीव | ओहोटी | ओळीने |

### औ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| औचित्य | औत्सुक्य | औद्योगिक | औपचारिक | औषधी |

### क

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कठीण | कडकडीत | कणीक | कणीस | कथित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अरुण | अरुंधती | अर्जित | अर्जुन | अर्वाचीन |
| अलिखित | अलीकडे | अलौकिक | अल्पसंख्याक | अल्पायुषी |
| अवमानित | अवमूल्यन | अवर्णनीय | अवलिया | अविकारी |
| अवीट | अशिक्षित | अशील | अश्रू | अश्लील |
| अश्विनी | अष्टौप्रहर | असहाय | असहिष्णुता | अस्खलित |
| अस्तित्व | अस्त्र | अस्थिर | अस्थी | अस्मिता |
| अहर्निश | अहिराणी | अहिंसा | अक्षय्यतृतीया | अक्षरशः |
| अंकित | अंकुर | अंकुश | अंगीकार | अंगुष्ठ |
| अंगूर | अंघोळ | अंजीर | अंतर्भूत | अंतर्मुख |
| अंतिम | अंधकार | अंधश्रद्धा | अंधळा | अंधूक |

## आ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आइस्क्रीम | आकर्षित | आकस्मिक | आकुंचित | आक्रस्ताळेपणा |
| आख्यायिका | आगळीक | आगंतुक | आणि | आतिथ्य |
| आतुर | आत्महत्या | आत्मिक | आत्मीय | आत्यंतिक |
| आदी | आधारित | आधिपत्य | आधुनिक | आध्यात्मिक |
| आनंदित | आनुवंशिक | आनुषंगिक | आन्हिक | आमसूल |
| आमंत्रित | आयुध | आयुष्य | आर्थिक | आलंकारिक |
| आलिशान | आलिंगन | आवर्जून | आविर्भाव | आविष्करण |
| आवृत्ती | आशीर्वाद | आश्विन | आषाढ | आसक्ती |
| आस्तिक | आहुती | आंतरराष्ट्रीय | आंतरिक | आंबूस |

## इ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इच्छापूर्ती | इच्छित | इच्छुक | इतःपर | इतिहास |
| इत्यादी | इन्स्पेक्टर | इब्लिस | इशारा | इष्ट |
| इस्त्री | इस्पितळ | इंगळी | इंगित | इंग्लिश |
| इंजिनियर | इंदिरा | इंदुमती | इंदू | इंद्रिय |



३२. पद्यात वृत्ताचे बंधन पाळताना ऱ्हस्व-दीर्घाच्या बाबतीत हे नियम काटेकोरपणे पाळणे शक्य नसल्यास कवीला तेवढ्यापुरते स्वातंत्र्य असावे.

३३. जेव्हा नामांना 'इक' प्रत्यय लागून तत्सम विशेषणे तयार होतात, तेव्हा मूळ शब्दातील शेवटचा स्वर निघून जातो व त्या शब्दाच्या प्रारंभीच्या अक्षरातील स्वराची वृद्धी पुढीलप्रमाणे होते :-

अ-आ ची वृद्धी - आ, इ-ई-ए ची वृद्धी ऐ, उ-ऊ-ओ ची वृद्धी औ.

उदा. - नगर - नागरिक, प्रसंग - प्रासंगिक, दिन - दैनिक, उद्योग - औद्योगिक, भूगोल - भौगोलिक, लोक - लौकिक, वेद - वैदिक, पुराण - पौराणिक.

अपवाद - इक प्रत्यय स्वामित्वदर्शक किंवा युक्तार्थी असेल तर वृद्धी होत नाही. उदा. - धन - धनिक, रस - रसिक, श्रम - श्रमिक, क्रम - क्रमिक, क्षण - क्षणिक, सुवास - सुवासिक.

३४. तत्सम नसलेल्या मराठी शब्दांना 'ईक' प्रत्यय लागून भाववाचक नामे किंवा धातुसाधित विशेषणे तयार होतात, तेव्हा उपान्त्याक्षर दीर्घ लिहावे.

उदा. - पडीक, खर्चीक, सोशीक ('सोसणारा' या अर्थाने), आगळीक ('अमर्याद वर्तन' किंवा 'अपराध' या अर्थाने), जवळीक, सोयरीक ('सोयरेपणा' किंवा 'नाते' या अर्थाने), गिऱ्हाईक, मोकळीक, लाडीक.

३५. 'इत' हा प्रत्यय असून तो तत्सम शब्दांना लावताना उपान्त्याक्षर ऱ्हस्व लिहावे.

उदा. - अपेक्षित, अगणित, अखंडित, इच्छित, चकित, त्वरित, प्रकाशित, मर्यादित, शिक्षित, सहित, सुधारित, संग्रहित, विवाहित, पीडित, मुद्रित, संपादित.

अपवाद - निर्णीत (निर् + नीत), विपरीत.

३६. 'ईत' हा मराठी शब्दांना लागून येणारा प्रत्यय असून त्यामुळे विशेषणे तयार होतात, तेव्हा उपान्त्याक्षर दीर्घ राहते.

उदा. - कुरकुरीत, गुळगुळीत, चकचकीत, टवटवीत, तुळतुळीत, बुडीत, पटाईत, सराईत, सुटसुटीत, सुरळीत.

३७. 'ईय', 'कीय', 'अनीय' हे प्रत्यय लावताना उपान्त्याक्षर दीर्घ राहते.

उदा. - भारतीय, राष्ट्रीय, कुटुंबीय, वर्गीय, स्वर्गीय, शास्त्रीय, पूजनीय, वर्णनीय, प्रेक्षणीय, रमणीय, स्मरणीय, शोचनीय, शासकीय.

३८. 'ईय' प्रत्यय लागून होणाऱ्या नामाचे सामान्यरूप करताना 'ई' दीर्घच राहते.

उदा. - भारतीयांचा, राष्ट्रीयता, कुटुंबीयांचा, महाराष्ट्रीयांची.

३९. काही तीन अक्षरी शब्दांतील पहिले अक्षर दीर्घ असेल व दुसरे/उपान्त्य अक्षर ई-कारयुक्त किंवा ऊ-कारयुक्त असेल तर त्या जागी सामान्यरूपाच्या वेळी 'अकार' येतो. पहिले अक्षर ऱ्हस्व असल्यास तो विकल्पाने होतो.

उदा. - बेडूक - बेडकाचा, उंदीर - उंदरांनी, तारीख - तारखेला, शेपूट - शेपटास, तांदूळ - तांदळात.

४०. उपान्त्याक्षर दीर्घ 'ई' हा स्वर असेल तर सामान्यरूपात 'ई' बद्दल 'य' येतो.

उदा. - फाईल - फायलीत, बाईल - बायलीला.

४१. उपान्त्याक्षर 'ऊ' हा स्वर असेल तर सामान्यरूपात 'ऊ' बद्दल 'व' येतो.

उदा. - देऊळ - देवळात, पाऊस - पावसात.

४२. तीन अक्षरी शब्दांत मधले अक्षर द्वित्त असेल (एकच अक्षर दोनदा येऊन जोडाक्षर झाले असेल) तर सामान्यरूपाच्या वेळी द्वित्व नाहीसे होते.

उदा. - चप्पल - चपलेचा, रक्कम - रकमेचा, छप्पर - छपरावर, दुप्पट



मेघश्याम, हाहाकार.

विसर्ग असलेले शब्द - अंतःकरण, कःपदार्थ, तेजःपुंज, दुःशासन, दुःसाध्य, निःशब्द, निःशंक, निःश्वास, निःपक्षपाती, निःस्पृह, निःसीम, प्रातःकाल, मनःस्थिती, प्रायः, स्वतः, विशेषतः.

विसर्गाचा 'ष' होणारे शब्द - आविष्कृत, चतुष्कोण, दुष्कीर्ती, निष्पन्न, निष्कर्ष, निष्क्रिय, निष्काम, बहिष्कार.

▣▣▣

# शुद्ध शब्द

## अ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अकल्पित | अखंडित | अखिल | अगणित | अगतिक |
| अग्नी | अघटित | अचूक | अजातशत्रू | अजित |
| अजिबात | अजीर्ण | अजून | अणकुचीदार | अणू |
| अतिथी | अतिरिक्त | अतिशयोक्ती | अतीत | अतींद्रिय |
| अतुलनीय | अत्याधुनिक | अद्‌भुत | अद्ययावत | अद्यापि |
| अद्वितीय | अधिक | अधीक्षक | अधू | अध्यात्मिक |
| अनपेक्षित | अनभिज्ञ | अनसूया | अनाहूत | अनिमिष |
| अनियमित | अनियंत्रित | अनिरुद्ध | अनिर्णीत | अनिल |
| अनिवार्य | अनिश्चित | अनिष्ट | अनुकरणीय | अनुकूल |
| अनुक्रमणिका | अनुचित | अनुत्तीर्ण | अनुभूती | अनुपस्थिती |
| अनुमती | अनुयायी | अनुरूप | अनुसूचित | अपरिचित |
| अपरिमित | अपरिहार्य | अपशकुन | अपूर्वाई | अपेक्षित |
| अप्रतिम | अप्रूप | अब्रूदार | अभिरुची | अभिलाषा |
| अभिव्यक्ती | अभीष्टचिंतन | अभ्यसनीय | अमानुष | अमित |
| अमीर | अमूर्त | अमूल्य | अरविंद | अरिष्ट |

५७. च, ही, ना, मात्र, देखील, पण, सुद्धा, वर, खाली अशी शब्दयोगी अव्यये जोडूनच लिहावी.
उदा. - घोड्यावर, झाडाखाली, जणूकाही, कुणीतरी, तूपण, फारतर, जास्तच, तूही, तरीदेखील, आम्हीसुद्धा, सर्वांना.
अपवाद - 'वेळी' हा शब्दयोगी अव्यय नाही. तो जोडून लिहू नये.
उदा. - अशा वेळी, त्या वेळी, ज्या वेळी.

# गोंधळात टाकणारे शब्द

न - कान, खून, तान, पान, जुने, नवे, सैनिक, चैन, सुने, मन, छान, कीर्तन, प्रकाशन, समर्थन.
ण - कणिक, खाण, खूण, घाण, ताण, प्राण, प्राणी, पाणी, मेणबत्ती, आणि, मरण, निर्माण, परीक्षण.
श - इशारा, खुशाल, पोशाख, विशद, विशेष, दिशा, शाखा, शेळी, हुशार, शाळा, शेव, काशी, शांती, शिक्षण, सुशीला.
ष - विष, विषय, रेषा, विषाद, पुरुष, शोषित, चषक, संतोष, सुभाष, विदूषक, सहिष्णू, विष्णू, षोडशी, भाषा, सुषमा.
ष्ट - इष्ट, कष्ट, खाष्ट, नष्ट, शिष्ट, अष्ट, दुष्ट, दृष्ट, गोष्ट, समाविष्ट, विशिष्ट, पुष्ट, स्पष्ट, चौसष्ट, भ्रष्ट, उत्कृष्ट.
ष्ठ - कनिष्ठ, गर्विष्ठ, ज्येष्ठ, श्रेष्ठ, वरिष्ठ, कुष्ठरोग, बलिष्ठ, प्रतिष्ठा, पृष्ठ, निष्ठा, अनुष्ठान, पराकाष्ठा.
स्र - अजस्र, चतुरस्र, सहस्र, सहस्रबुद्धे, स्रवणे, रक्तस्राव, स्रोत, हिंस्र.
स्त्र - अस्त्र, स्त्री, इस्त्री, वस्त्र, शिरस्त्राण, शस्त्र.
विसर्ग नसलेले शब्द - अंधकार, अंधश्रद्धा, धिक्कार, निस्तेज, पृथक्करण,



- दुपटीने, जिन्नस - जिनसाला.
४३. तीन अक्षरी शब्दांत पहिले अक्षर सानुस्वार व दुसरे अक्षर 'म' असेल तर सामान्यरूपाच्या वेळी पहिले अक्षर निरनुस्वार होते.
उदा. - अंमल - अमलात, किंमत - किमतीचा, गंमत - गमतीने, हिंमत - हिमतीचा, जंमत - जमतीने.
४४. शब्दांच्या अंती 'सा' हे अक्षर असेल तर सामान्यरूपाच्या वेळी त्याचा 'शा' होतो.
उदा. - कसा - कशासाठी, घसा - घशात, आरसा - आरशात, मासा - माशाचा, पैसा - पैशासाठी, कोळसा - कोळशाची, ससा - सशांचा, खिसा - खिशात.
४५. आकारान्त पुल्लिंगी शब्दांचे सामान्यरूप करताना शब्दाच्या शेवटी 'जा' हे अक्षर असेल तर त्यास 'ज्या' असे न करता 'जा' असेच ठेवावे.
उदा. - दरवाजा - दरवाजात, दर्जा - दर्जाला, फौजा - फौजांनी, मोजा - मोजात, बाजा - बाजाची.
४६. धातूला 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लावताना धातूच्या शेवटी 'व' असेल तर 'वू' किंवा 'वून' होते. 'व' नसेल तर 'ऊन'च राहते.
उदा. - जा - जाऊन, धू - धुऊन, पी - पिऊन, गा - गाऊन, ठेव - ठेवून, जेव - जेवून, चाव - चावून, दाखव - दाखवून.
४७. नामाला 'य' प्रत्यय लागताना व शब्दाला 'त्य' प्रत्यय लागताना पहिल्या स्वराची वृद्धी पुढीलप्रमाणे होते :-
अ-आ ची वृद्धी आ, इ-ई-ए ची वृद्धी ऐ, उ-ऊ-ओ ची वृद्धी औ.
उदा. - पवित्र - पावित्र्य, पश्चात - पाश्चात्य, विशिष्ट - वैशिष्ट्य, दक्षिण - दाक्षिणात्य, अतिथी - आतिथ्य, निपुण - नैपुण्य, कुशल - कौशल्य, उचित - औचित्य.

४८. शब्दांच्या शेवटी ‘य’ आल्यास सामान्यरूपाच्या जागी ‘यी’ ऐवजी ‘ई’ येते.

उदा. - कोय - कोईत, गाय - गाईचा, साय - साईचा.

४९. ई-कारान्त स्त्रिलिंगी शब्द असेल तर अनेकवचनी सामान्यरूपात ‘ई’ बद्दल ‘या’ येतो.

उदा. - चढाई - चढायांत, बढाई - बढायांनी, लढाई - लढायांत, सुई - सुयांची, समई - समयांची, बाई - बायांनी.

५०. जोडशब्दाचे सामान्यरूप करताना काही वेळा दोन्ही भागांचे सामान्यरूप होते.

उदा. - आंधळ्यापांगळ्यांना, मुलाबाळांना, घराघरांतून, खेड्यापाड्यात, बायामाणसांनी, खऱ्याखोट्याचा.

५१. ऊ-कारान्त विशेषनामाचे सामान्यरूप करताना बदल होत नाही.

उदा. - गणू - गणूस, बापू - बापूंना, नामू - नामूची, शकू - शकूने.

५२. जोडाक्षरे लिहिताना मराठीतील उच्चारानुसारच लिहावी.

उदा. - ब्रम्ह, ब्राम्हण, चिन्ह, ऱ्हस्व, जिव्हा, स्पष्ट, सप्त, पर्याप्त, द्वंद्व.

संस्कृतात ब्रम्ह, ब्राम्हण हे शब्द ब्रह्म, ब्राह्मण असे लिहिले जातात; परंतु मराठीत वर्णविपर्यय होतो. मराठीत ‘ह’चा उच्चार आरंभी न होता, वर्णांची अदलाबदल होते.

अपवाद - वह्या, हृदय.

५३. अन्त्याक्षर रेफयुक्त (रफारयुक्त) जोडाक्षर असेल, तर त्यामागील इकार, उकार दीर्घ असतात.

उदा. - दीर्घ, कीर्ती, मूर्ख, मुहूर्त, चूर्ण, पूर्ण, स्फूर्ती, अपूर्ण, विस्तीर्ण.

अपवाद - निर्, दुर् हे उपसर्ग लागल्यास ते ऱ्हस्वच राहतात.



उदा. - दुर्गम, निर्णय, दुर्दैव, निर्भेळ.

भाववाचक नामांतही रेफापूर्वीचे अक्षर ऱ्हस्वच राहते.

उदा. - चतुर - चातुर्य, मधुर - माधुर्य.

५४. सर्वनामाचे सामान्यरूप करताना अन्त्य स्वर ऱ्हस्व उच्चारला जातो, म्हणून तो ऱ्हस्व लिहावा.

उदा. - तू - तुला, ती - तिने, ही - हिला, जी - जिची.

अपवाद - ‘स’ किंवा ‘त’ प्रत्यय लावताना अन्त्य स्वर दीर्घच ठेवावा.

उदा. - तू - तूस, ही - हीस, जी - जीत.

५५. ‘त्व’ प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात, तेव्हा पहिल्या स्वरात बदल होत नाही; परंतु शब्दाच्या शेवटी मुळात ‘त’ असेल तर ‘त्व’ लागताना ‘त’चे द्वित्व होते.

उदा. - त - नृप - नृपत्व, गुरू - गुरुत्व, व्यक्ती - व्यक्तित्व, अंधत्व.

उदा. - त्त्व - तत्त्व, तात्त्विक, व्यक्तिमत्त्व, सात्त्विक, महत्त्व, सत्त्व.

५६. मराठीत अन्त्य व उपान्त्य अक्षरांपूर्वीचे इकार, उकार सामान्यतः ऱ्हस्व असतात.

उदा. - किनारा, किरकोळ, कुरकुरीत, दिवाळी, चिमुकला, सुरळीत, हिंदुस्थान, हुकुमशाही.

अपवाद - मराठी सामासिक व तद्धित (प्रत्यय लागून बनलेले) शब्द यथोच्चार लिहावे.

उदा. - सामासिक व अभ्यस्त शब्द - आईबाप, आजूबाजूला, दाढीमिशा, आनंदीआनंद, काहीतरी, मीठभाकर, शेतीभाती.

तद्धित (प्रत्यय लागून बनलेले) शब्द - गाडीवाला, अलीकडे, जहागीरदार, दीनवाणा, पलीकडे, भाजीपाला, सफाईदार.